कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २३-३५/९४.

क्र. राप/कर्मवर्ग/६०४-वै/ ६०२२
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०000८. दिनांक ११ नोव्हेंबर, १९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा.प. मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

मुख्य सल्लागार,
संस्थांतर्गत व्यवस्थापन सल्लागार, रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक, रा.प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई /
मुंबई / धुळे / जळगांव / नाशिक / पालघर / रायगड [पेण] / रत्नागिरी /
सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर /
औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी /
नागपूर / अकोला / अमरावती / भंडारा / बुलढाणा / चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

कार्यकारी अभियंता, रा.प. औरंगाबाद / धुळे / कोल्हापूर / नागपूर / पुणे /
परभणी / कुर्ला / अकोला / बारामती.

विषय : कर्मचारी कर्तव्य पार पाडीत असतांना अपघात
घडल्यास कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेसाठी
रा.प. कर्मचाऱ्याने खरेदी केलेल्या उपकरणाबाबत
सेवाविनियम १९५-१९६ प्रमाणे करावयाची प्रतिपूर्ती.

....

एखादा रा.प. कर्मचारी नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडीत असता त्याला अपघात झाल्यास रुग्णालयामध्ये दाखल करण्यात येते. अशा प्रकरणी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती सेवाविनियम क्रमांक १९५ व १९६ प्रमाणे करण्यात येत असते. अशा उपचारामध्ये प्रसंगी हाडावरील शस्त्रक्रिया करणे जरूरीचे ठरते व त्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी उपकरणे कर्मचाऱ्याला बाहेरून खरेदी करावयास रुग्णालयाकडून सांगितले जाते. तथापि याबाबत असे आढळून आले आहे की, प्रत्यक्ष शस्त्रक्रियेच्या वेळी खरेदी केलेली [उदा. रॉड, क्लॅम्प, स्क्रू या सारखी] सर्वच उपकरणे उपयोगात आणली जात नाहीत, किंवा नंतर कालांतराने दुसरी शस्त्रक्रिया करून अथवा भरून आल्यामुळे त्या उपकरणांची शरीरात गरज नसल्याने ती पुन्हा काढून घेतली जातात. मात्र कर्मचाऱ्यास परत दिली जात नाहीत. एवढेच नव्हे तर त्यावरील किंमतीचा त्या उपचारावरील देयकात समावेश केला जातो. हे बरोबर नाही. जर सदर उपकरणे / साधने कर्मचाऱ्यास परत दिली जात नसतील तर ती रुग्णालयातच ठेवून घेतली जातात असा त्याचा अर्थ होतो, व तसे असल्यास रुग्णालयाच्या देयकात त्याचा आकार दर्शविणे चुकीचे ठरते, कारण ती संबंधित कर्मचारी रुग्णाने स्वतः च्या खर्चाने आणलेली असतात. म्हणून एकतर ही उपकरणे कर्मचाऱ्यास परत होणे आवश्यक आहे किंवा ते न केल्यास देयकात त्यांचा खर्च समाविष्ट होता कामा नये.

सबब या द्वारे सर्व कर्मचाऱ्यांना असे स्पष्ट करण्यात येते की, अशा प्रकरणी ही बाब त्यांनी संबंधित रुग्णालय प्राधिकाऱ्यांच्या वेळीच ध्यानात आणून द्यावी